क्रमांक : १२०

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८/कार्तिक ७, १९४० शके.

१६३. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर,२०१८ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०१८ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना पूर्णत: एम.ओ.आय.एस. (**MOIS**) या संगणक प्रणालीवर **ONLINE** पध्दतीने मंगळवार, दिनांक १३ नोव्हेंबर,२०१८ पासून सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंन्त स्वीकारण्यात येतील.

(२) **ONLINE** पध्दतीने प्राप्त होणाऱ्या लक्षवेधी सूचनांना संगणकीय प्रणालीद्वारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल.

(३) महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे.

(४) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा **ONLINE** पध्दतीने लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

(५) लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यासंबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार हा मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २९ ऑक्टोबर,२०१८.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

**प्रती :-**

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(५) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय.
(७) मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
(८) संगणक कक्ष **(WEBSITE)**
(९) एम.के.सी.एल कक्ष **(MKCL)**